# सावर रे !

प्रकाशित: अक्षरसिध्दी दिवाळी अंक २०१० .

**रत्नाकर वाणी**

पुनरारंभ

© पुनरारंभ

**website:** http://www.rajratna.co.in **Email:** ratnakar.wani@rajratna.co.in

# सावर रे !

विवाह बंधन एक पवित्र समाजिक बंधन. दोन कुटुंब, दोन घराणी यांचे मिलन. दोन जिवांचे पवित्र मनोमिलन. म्हणून विवाह संस्कार मानवी जिवनातील सोळा संस्कारापैकी एक महत्वाचा संस्कार मानला जातो. या संस्कारा उपरांत गृहस्थाश्रमास सुरूवात होते. यालाच प्रचलित भाषेत संसार म्हणता येईल. पति व पत्नी ही या संसाररूपी रथाची दोन चाके आहेत. येथे पती व पत्नी यांचे आपसी प्रेम, विश्वास असणे अत्यंत जरूरीचे आहे व दोहोनी मिळून हा संसार रूपी रथाचा गाडा ओढत नेउन आपले भावी वैवहिक जिवन सुखी बनवायचे असते.

संसार म्हटला की घर हे ओघाने आलेच. केवळ चार भिंती व डोक्यावर छप्पर याला घर म्हणणे योग्य ठरणार नाही. तर घरात एकमेकाची सुख दुःख समजून घेणारी, एकमेकाला समजून एकमेकात मिळून मिसळून वागणारी, मनमिळाउ व प्रेमळ माणसे असणे अत्यंत महत्वाचे आहे. जेव्हा एका घरात एकापेक्षा अनेक व्यक्ती वास्तव्यास असतात तेथे व्यक्ती तितक्या प्रकृति या निसर्ग नियमा नुसार केव्हातरी कोठेतरी मतभेद होणे अपेक्षित आहे. प्रसंगी शब्दरूपी फटाक्यांची उधळण होउन शब्दांची देवाण घेवाण होते व घरातील शांतता भंग पावते. अशा वेळी संयम, सामंजस्य व मनाचा मोठेपणा फार महत्वाचा ठरतो. वादी प्रतिवादी दोघांनी एकमेकास समजून घेतल्यास वाद लवकर मिटतो अन्यथा विकोपास जातो. उपरोक्त छोटया मोठया गोष्टींचा गंभीर विचार न झाल्यास उद्वेगाचे भरात कळत न कळत नको तेच घडते व संसाराचे पारडे एकत्रित कुटूंबामधून विभक्तिकरण, प्रसंगी घटस्फोटा कडे फिरण्यास वेळ लागत नाही.सहाजिकच संसार कोलमडून दोन जिवांच्या आयुष्याचा विध्वंस होतो. अशा वेळी वाद घालण्या पेक्षा तो कां व कसा उत्पन्न झाला याचा खोलवर विचार करणे गरजेचे आहे. असा वाद परत उदभवू नये म्हणुन ज्या कारणे वाद झाला त्या गोष्टी अथवा त्या कीयांची पुनरावृत्ती न होउ देणे सर्वांचे दृष्टिने हितावह ठरेल. ज्या प्रमाणे आळूच्या पानावर पाणी थांबत नाही तद्वत वादास आळवावरचे पाणी समजून झाले गेले विसरून परत आपल्या नित्यकर्मास लागणे योग्य ठरेल. संसारात वाद विवादा शिवाय अनेक सुख दुःखाचे प्रसंग देखिल येत असतात या सगळयांना वेळोवेळी प्रसंगानुरूप सामोरे जाऊन आलेले क्षण सुखी करायचे असतात.

विभक्तिकरण अथवा घटस्फोटास एकच कारण नाही तर अनेक कारणे घडतात. यात सध्याच्या युगात इलेक्ट्रॉनिक माध्यमे देखिल मागे नाहीत. सध्या बहुतेकांकडे मोबाईल असणे सर्वसामान्य झाले आहे. मोबाईल नाही म्हणजे आपल्याकडे काही कमी असल्याची भावना सध्याच्या तरूणाईला वाटते. मोबाईल असणे हे एक भूषण मानले जाते. मोबाईल केवळ संदेश देवाण घेवाणाचे साधन आहे याचा साफ विसर सर्वांना पडलेला दिसतो. याचा सदउपयोग होण्यापेक्षा दुरूपयोगच जास्त होत असल्याचे जाणवते.

काही अतिदक्ष जागरूक पालक व नातेवाईक मंडळी विवाह उपरांत वधूस केवळ 'दिल्या घरी तु सुखी रहा' असा शुभ आशिर्वाद देउन थांबत नाहीत तर दिवसातील बहुतांश वेळ मोबाईल द्वारा त्यांचे संपर्कात राहून जेवलात का? काय खाल्ले? तिकडे गेले होते काय? कसे गेले? कोणत्या गाडीने परतले? वगैरे अनावश्यक प्रश्नोत्तरांनी आपला तसाच समोरच्या व्यक्तिचा पण  वेळ वाया घालवतात. या वेळी वेळेचा अथवा आर्थिक बाबींचा देखिल विचार केला जात नाही. याउपरांत येथेच न थांबता नविन कुटुंबाच्या चालीरीती, तेथील कौटुंबिक तसेच आर्थिक परिस्थिती लक्षात न घेता सहजपणे अनाहूत व अनावश्यक सल्ले दिले जातात. नव्या घरी आपला सल्ला कितपत फायदेमंद व योग्य ठरेल याची यत्किंचितही जाण ठेवली जात नाही.

सुरवातीला वधू वर उभय एकमेकांच्या नविन कुटुंबाबद्दल ओल्या मातीच्या गोळयाप्रमाणे अनभिज्ञ असतात. यास जसा आकार द्याल तसा घडतो. एकमेकांच्या कुटुंबाच्या चालिरीती रीती रिवाज याची त्यांना पूर्ण कल्पना नसते. सहाजिकच ज्यांचे समवेत विवाहापूर्वीची २०/२५ वर्षे राहिली त्यांचे शब्द प्रमाण मानत त्याप्रमाणे वर्तणूक अथवा क्रीया त्यांच्याकडुन घडते. त्यांची अशी अनोखी क्रीया अथवा वर्तणूक नव्या घरी कदाचित न रूचल्यामुळे थोडीशी कुरबुर, नाराजी होते व आपसात कळत न कळत कटुता निर्माण होते आणि येथूनच कलहास सुरवात होते. याच्या पुनरावृत्तींमुळे दोन कुटुंबामध्ये गैरसमज व तेढ निर्माण होउन आपसात मनमुटाव होतो. सहाजिकच नविन नात्यांमध्ये दरी निर्माण होते. येथे देखिल उभय पक्षांनी समंजसपणा न धरल्यास नात्यामधील दरी वाढत जाते.

संत कबिराच्या दोह्याप्रमाणे रहिमन धागा प्रेमका टूटेसे ना टूटे, जुडे तो फिर गाठ पड जाय. तद्वत एकदा दुभंगलेली मने परत जुळत नाहीत व जुळलीत तरी मनमुटाव कायम राहतो.

हे सर्व टाळायचे असल्यास सूज्ञ पालकांनी आपल्या पाल्यांच्या उज्चल भवितव्याचा विचार करता पदोपदी नवविवाहितांच्या संसारामध्ये अवाजवी दखल न देता यथा उचित मर्यादा पाळून संसार मोडण्यापासून सावरणे उचित ठरणार नाही काय ?